# छ. राजर्षी शाहू महाराज आणि सत्यशोधक चळवळ: एक अभ्यास

**डॉ. भीमाशंकर मधुसूदन डहाळके** राज्यशास्त्र विभागप्रमुख जे रामराव महाविद्यालय जत ता.जत जि. सांगली. Email: bmdahalke@gmail.com

---

कोल्हापूर संस्थानचे छत्रपती थोर समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६जून १८७४ साली कोल्हापूर जिल्ह्यातील 'कागल' नावाच्या गावात झाला. १८९४ कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. म.फुले नंतर सत्यशोधक समाजाचे नेतृत्व व बहुजन समाजाच्या कल्याणाचे कार्य महाराजांनी केले. सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. अनेक समाजसुधारणा चळवळीत महाराजांनी प्रभावी भूमिका पार पाडली. या शोधनिबंधाच्या माध्यमातून शाहू महाराजांचे सत्यशोधक चळवळीतील कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. १९१० सालच्या अखेरीस शाहू छत्रपतींच्या आयुष्यातील ब्राम्हणेत्तर चळवळीचे पहिले प्रभुत्वाला यशस्वी आव्हान दिले खरे पण ते चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या चौकटीचा स्वीकार करुन! चातुर्वर्ण्य पध्दतीत क्षत्रियांना दिले जाणारे हक्क आपल्याला आपले कुळ क्षत्रिय असल्याने मिळावेत असा छत्रपतींनी विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात आग्रह धरला होता.

चातुर्वर्ण्य पध्दतीसकट आर्यांची सर्व वैदिक परंपराच नाकारणाऱ्या महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक अनुयायांनी वेदोक्त प्रकरणात ब्राम्हण पुरोहितशाहीविरुध्द शाहूंची बाजू उचलून धरल्याने सत्यशोधक समाजाला साहाय्य करावे असे शाहूंना वाटणे साहजिकच होते. १९१० पूर्वी शाहू परंपरानिष्ठ (कोंझर्वेटिव) होते.सत्यशोधक समाज, ब्राम्ह समाज, प्रार्थना समाज वगैरे धर्मसुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या चळवळींना १९१० नंतरच्या काळात ते मदत करु लागले. मात्र त्यांचा ओढा आर्य समाजाकडे होता हे कर्मवीर शिद्यांसारख्या सुधारकास उघड दिसत होते. "आर्य समाजाच्या महशूर नरवीर प्रतापसिंह महाराज यांचा मी अनुयायी आहे" असे शाहू छत्रपती जाहीर सभेत सांगत असत. शाहू छत्रपतींचे आद्य चरित्रकार लठ्ठे यांच्या माहितीप्रमाणे कोल्हापूरात सत्यशोधक

समाज स्थापन करण्याचा प्रस्ताव प्रथम जानेवारी १९११ मध्ये विचारात घेतला गेला. १९१२ सालच्या ऑगस्टच्या अखेरच्या आठवड्यात बाबूराव यादव, नानासाहेब मुळीक वगैरेंनी ब्राम्हण पुरोहितांच्या मदतीशिवाय वेदोक्त पध्दतीने श्रावणी केली आणि जानवी घातली. २४ सप्टेंबरला महात्मा फुलांच्या सत्यशोधक समाजाचा स्थापनादिन साजरा करण्यात आला. या वेळी दीनमित्र हे सत्यशोधकांचे एकुलते एक साप्ताहिक नगर जिल्हयातून निघत असे. ७ मे १९१० रोजी कृष्णाजी पांडुरंग भालेकर कालवश झाल्यानंतर त्यांचे चिरंजीव मुकुंदराव पाटील ३१११ गुरुगण्याचा उपक्रम १९२०एक विचार करण्याऐवजी शिक्षण प्रसारवा अनिष्ट पार्थडा पडला. १९११सालच्या एप्रिलमध्ये पुण्यालासमपहिली परिषद महात्मा फुल्यांचे निकटचे सहकारी स्वामी व् भरली होती. १९९२ सालच्या मार्च महिन्यात दीनमित्रलीला होऊ लागले ते १९९३ च्या में पर्यंतप्रसिद१९१९ळात डावलेल्या आणि निस्तेज झालेल्या सत्यशोधक चैतन्य व जोम आणण्यासाठी १९९१ पासून झालेल्या विविध उपक्रमांत भास्कर अण्णासाहेब महादेवराव डोंगरे या कोल्हापूर दरबारातील अधिकाऱ्यांनी सहभागी होते.१९१३ सालच्या तिसऱ्या सत्यशोधक

समाजाच्या परिषदेचे महादेवरा श्री शाहू छत्रपती महाराजांच्या कृपेने सत्यशोधक समाजाचे काम मोठ्या उत्साहाने असल्याचे कोल्हापूरच्या शाखेचे चिटणीस हरिभाऊ चव्हाण यांनी कळविलेले कोल्हापूरचा सत्यशोधक समाज स्थापन होऊन पाच-सहा महिनेच झाले असले तरी संस्थानातच समानाने काम केले असे नाही तर कुरुंदवाड, सातारा, ठाणे वगैरे या समाजाच्या माणसांनी काम केले असल्याचे वृत्त दीनमित्राने १ ऑक्टोबर १९९३ अंकात प्रसिद्ध केल्याचे दिसते. या वेळी कोल्हापूरच्या सत्यशोधक समाजाचे एकूण दो सभासद होते. त्यापैकी "तीन सभासद कुळकणी अर्थात ब्राम्हण असल्याचेही १९ नो १९९३ दीनमित्रातील वृत्ता आवर्जून नोंदविलेले आढळते. १९२१ सालीया जागृती पत्राने शाहू छत्रपतींचे एक पत्र प्रसिद्ध केले त्या त्यांनी म्हटले होते. मी सत्यसमाजिस्ट केव्हाही नव्हतो व नाही. तसे मी माझ्या सार्वजनिक भाषणात स्पष्टपणे बोलूनही आहे. हुबळीस ब्राम्हणेत्तर समाजाची कॉन्फरन्स झाली सेवा तेथील सत्यसमाजाने पानसुपारीस बोलाविले. त्यांनी सांगितले की, मी सत्यसमाजि नाही व सत्यसमाजिस्ट म्हणून मी येणार नाही. कोल्हापूरात आर्य समाज, चिऑसफी वगैरे पंच आहेत. त्यापैकीच सत्यसमाज हा एक आहे. २२ ऑक्टोबर १९२० रोजी खा जाधव यांना लिहिलेल्या खासगी पत्रातही आपण सत्यशोधक नाही हे शाहू छत्रपती निःसंदिग्ध शब्दात सांगितले आहे. आपण आर्य समाज मताचे कसे झालो हे २४ नोव्हेंबर १९१८ रोजी मुंबईत झालेल्या नाहीर सभेत सांगताना शाहू छत्रपती म्हणाले, क्षत्रिय कुलावंतास महाप्रतापी महाराज प्रतापसिंह व मी एका स्टीमरने राज्यारोहण समारंभाकरिता विलायतेस गेलो तेव्हा त्यांनी होते समजावून दिली. विलायतेतून परतल्यानंतरच्या दहा-पंधरा वर्षीच्या सत्यशोधक समाज, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, विऑसफी, आर्य समाज वगैरे सामाजिक व धार्मिक सुधारणांचा आग्रह धरणाच्या पंचांच्या तत्त्वांची आणि कार्याची शाहूंनी नीट माहित मिळविली आणि तेआर्यसमाजाकडे झुकले. आर्यसमाज वेदाच्या दृढ पायावर स्थापिलेला दाइका जुना ग्रंथ कोणताही नाही. वेदांचे प्रमाणच या आर्यावर्तात बहुतेकांस फूल बेदाविषयी पूज्य बुध्दी बहुतेकांच्या मनात आहे. असा से निर्वाळा देऊ लागले. शोधक समाज, आम्हो तसेच प्रार्थना समाज कोणताही एक ग्रंथ प्रमाण मानत नाही. आर्य समाज वेदप्रामान्य मानणारा आहे. खरे ज्ञान वेदांमध्ये असल्याने वेद पठण करण्याचा, ते ऐकण्याचा आणि शिकविण्याचा अधिकार सर्व आयोना आहे. असे स्वामी दयानंद म्हणत असत. 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथात दयानंदांनी अठरा पुराणे, तांत्रिकांचे सिध्दान्त, चार्वाकाचे जवाद सत्यशान, जैन व बौध्द धमीयांचे सिध्दान्त, शेव तसेच वैष्णवांचे युक्तिवाद, कबीर, वल्लभाचार्य, स्वामी रामायण वगैरेचे पंच त्याज्य ठरविले आहेत. येशू ख्रिस्त तसेच यांच्या मतांचे खंडन करताना दयानंदांनी बायबल आणि पुराण या धर्मग्रंथांवर इ आहे. वेदकाळात अस्पृश्यता नव्हती असे दयानंदांचे म्हणणे असल्याने अस्पृश्यता नष्ट करण्याचा आग्रह आर्य समाज धरतो. शाहू छत्रपतीनी अस्पृश्यता शिवारण्यासाठी केलेले प्रयत्न, जातिभेद नष्ट करण्यासाठी तसेच विद्याप्रसार करण्यासाठी केलेली धडपड, बालविवाह, भृणहत्या, पडदापध्दती पैगेरे अनिष्ट रूढींना केलेला प्रखर विरोध, स्त्री शिक्षण, विधवाविवाह, गोरक्षण वगैरेंचा केलेला पुरस्कार या साम्या कृती आर्य समाजाच्या विचारसरणीशी सुसंगत होत्या. आर्य समाजाला मूर्तिपूजा मान्य नाही. शाहू मूर्तिपूजा करण्याचा परिपाठ मात्र सोडून दिला नाही. आर्य समाजास प्रिय असलेल्या होमहवनासारख्या कर्मकांडातही ते कधी गुरफटले नाहीत.

अखेरच्या चारपाच वर्षात आर्य समाजाला उत्तेजन देण्यामागची आपली भूमिका कर्नल बुझाऊस या राजनैतिक प्रतिनिधीला विशद करुन सांगताना शाहूंनी लिहिले आहे, सत्यशोधक समाजाला कसलाच पाया नाही. मात्र आर्य समाजाला वेदांचे अधिष्ठान आहे. इतर जातींना वेद शिकवण्याचा म्हणजेच ब्राम्हणांना जो आवडत नाही तो त्यांचा धर्म शिकविण्याचा माझा विचार आहे. आर्य समाज राजकारणात ढवळाढवळ करीत नसल्याने सरकार त्यास साहाय्य करीत आहे. आर्य समाज ही एक धार्मिक व सामाजिक संस्था आहे आमी जहाल अतिरेक्यांना शह देण्यात सरकारला तिची मदत होते." स्वामी दयानंदांच्या मृत्यनंतर आर्य समाजातही फूट पडली. महात्मा हंसराज, इदारचे प्रतापसिंह महाराज वगैरेंच्या इंग्रजी राजवटीवर निष्ठा होती. याउलट लाला लजपतराय, स्वामी श्रध्दानंद वगैरेंचा दुसरा गट इंग्रजांविरुध्द चाललेल्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाला होता. शाहू छत्रपतींनी आर्य समाजातील राजनिष्ठ गटाशी संबंध जोडला होता. शाहू छत्रपती सत्यशोधक विचारांचे पुरस्कर्त नव्हते तर आर्य समाजाचे सदस्य होते. आपली, आपल्या पत्नीची आणि सर्व आर्य समाजावर श्रध्दा असल्याचे त्यांनी कर्नल वूड्हाऊसला लिहिलेल्या आणखी एका पत्रातही स्पष्ट म्हटलेले आढळते. शाहू छत्रपती सत्यशोधक नव्हते तर आर्य समाजाला आणि वेदांना मानणारे होते अशी साक्ष विठ्ठल रामजी शिंदे यांच्याप्रमाणे छात्रजगदगुरु सदाशिवराव बेनाडीकर यांनीही दिली आहे. शाहू छत्रपतीच्या संदर्भात लिहिताना किंवा बोलतांना सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळ असा शब्दप्रयोगही सरसकट वापरला जातो. या शब्दांचा वापर करणाऱ्या अनेकांना छत्रपती सत्यशोधक होते असे वाटत असत. सत्यशोधक चळवळ ही मुळात धार्मिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी झटणाऱ्या लोकांची चळवळ होती. राजकारणाची चर्चाही वर्ज्य मानावी असा सत्यशोधक समाजाच्या आरंभीच्या काळात नियम होता आणि सभासद तो काटेकोरपणे पाळतील अशी दक्षता घेतली जात असे. इंग्रज राज्यकर्त्यावरील सत्यशोधकांच्या निष्ठेसंबंधी सुतराम संशय नसल्याने आणि सत्यशोधक चळवळ काँग्रेसच्या राजकारणापासून अलिप्त असल्याने सत्यशोधक मतांचा प्रसार इंग्रजांच्या पलटणीतील हिंदी शिपायांमध्येही करण्यास इंग्रज सरकारने मुभा दिली होती. महात्मा फुले यांच्या हयातीत तसेच त्यानंतरहो एकोणिसावे शतक संपेपर्यंत सत्यशोधक समाजावर दक्षिणी तसेच तेलगू फुलमाळो जातीच्या सभासदांचा मोठा प्रभाव होता. गवळी, शिंपी, कुणबी, साळी, कुंभार वगैरे जातीचेही त्यात सभासद होते. मात्र शाण्णव कुळातील मराठे त्यात अभावाने तळपत होते.

शाहू छत्रपतींनी पुढाकार घेतल्याने १९९७ नंतर सत्यशोधक चळवळीचे ब्राम्हणेत्तर या राजकीय चळवळीत रुपांतर झाले. कायस्थ, जैन आणि लिंगायत मंडळींनी ब्राम्हणेतर चळवळीला जोराची चालना दिली तरी ब्राम्हणेत्तर चळवळ आणि ब्राम्हणेतर पक्ष यांच्यावर मराठ्यांची पकड होती. सर्व सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीत सामील झाले याचा अर्थ ब्राम्हणेतर चळवळीत भाग घेणारा प्रत्येकजण सत्यशोधक विचारसरणीचा होता अशी समजूत करून घेणे चुकीचे ठरेल. मात्र ब्राम्हणेतर पक्षाचे प्रमुख नेते भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे भाऊराव पाटील, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील हे सत्यशोधक विचारांचे होते. सत्यशोधक समाजास शाहू छत्रपतींचा आश्रय मिळू लागल्यानंतर स्वताला सत्यशोधक म्हणवून घेणारे महत्वाकांक्षी, लोभी, कावेबाज लोकही त्यात शिरले. या अवस्थेचे

यथार्थ वर्णन १९३० साली भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या चौदाव्या परिषदेचे अध्यक्ष दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी केले आहे. "सन १९९५ च्या पुढे के. शाहू छत्रपती महाराज फोल्हापूर यांचे लक्ष समाजाकडे चांगलेच वेधले. अज्ञान, बहुजन समाजात लोपलेला मनुष्यपणा शिक्षणप्रचाराने जागृत होईल तेव्हा होवो पण सत्यशोधक समाजाच्या तत्वांचा फैलाव केला तर हो जागृती फार लोकर होईल हे मर्म जाणून शाहू महाराजांनी समाजास सवळ हाताने मदत केली. त्यामुळे अवघ्या पाच वर्षात महाराष्ट्रभर जागृतीची लाट उसळली पण या मदतीचा पुष्कळांनी दुरुपयोग केला.

महात्मा फुले आणि शाहू छत्रपती या दोघांनीही अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून आप्तस्वकीयांचा रोष पत्करुनही ठोस कृती केली. शाहू छत्रपतींनी अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांना नोकऱ्या दिल्या. त्यांच्या शिक्षणाची सोय केली. त्यांच्यापैकी वकील गलेल्यांना सनदा दिल्या. त्यांना विकास करुन घेण्याची संधी दिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या नेत्याच्या अंगचे गुण ओळखून त्यांना साहाय्य तर केलेच शिवाय हा तुमचा खरा पुढारी म्हणून त्यांची पाठ थोपटली. महात्मा फुले किंवा शाहू छत्रपतीच्याकृतिशीलतेचा हा वारसा भाऊराव पाटील, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर यांनी पुढे चालवला. केशवराव जेथे पर्वतीच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून झालेल्या सत्याग्रहात सामील झाले होते, तर दिनकरराव जवळकरांना नाशिकच्या काळाराममंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहास तेथील सनातन्यांनी बेदम मारहाण केली होती.

**सारांश -**

ब्राम्हणेत्तर चळवळीतील जी मंडळी सत्यशोधक नव्हती ती तर नेहमीच सत्यशोधक चळवळ आणि ब्राम्हणेत्तर चळवळ या दोन्ही वेगवेगळ्या असल्याचे ठासून सांगत असत. शाहू छत्रपती सत्यशोधक विचारसरणीचे नसून आर्य समाजाचे चाहते होते. सत्यशोधक चळवळ व ब्राम्हणेतर चळवळ या वेगळ्या होत्या, तसेच तेव्हा हळूहळू आकाराला येत असलेली दलितांची चळवळ या दोन्ही चळवळींशी जोडली गेली असली तरी तोही वेगळी होती. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शाहू छत्रपतींनी या तिन्ही चळवळीत केलेले मोलाचे योगदान लक्षात घ्यावयास हवे.

संदर्भ :

1. फडके य. दी., शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८६.
२. साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २०११.
3. सावळे दीपा, मोरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स,औरंगाबाद, २०१३.
4. गजमल माळी, सत्यशोधकांची अप्रकाशित पत्रे, चेत्रवेल दिवाळी अंक, १९८३.
5. मद्वण्णा यशवंतदादा, स्व. अण्णसाहेब लठ्ठे: जीवन व कार्य, १९७९.
6. पानतावणे गंगाधर, वादळाचे वंशज, १९८२.